# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
# बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

## अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००१४६६

**अपिलार्थी मो. अकील मो. यासीन**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी**
राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ, १३ वा मजला,
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालयासमोर, मुंबई ४०००३२

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह सचिव**
राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ, १३ वा मजला,
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालयासमोर, मुंबई ४०००३२

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०९.०९.२०२५**

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २२.१२.२०२३ | २७.१२.२०२३ | ०१.२०२४ | ३१.०१.२०२४ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २९.०२.२०२४ रोजीच्या अर्जान्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन मा. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र या कार्यालयाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. मा. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र कार्यालयाने सदर द्वितीय अपील दि. १६.०५.२०२४ रोजीच्या पत्रान्वये राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठाकडे हस्तांतरीत केले.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. २७.१२.२०२३ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. ३१.०१.२०२४ संलग्न केले आहेत.

अपिलार्थी यांनी दि. २२.१२.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:- *"माझे नाव मो. अकील मो. यासीन आणि माझा मुलगा मो. हसनाईन मो. अकील रा. २३ कोटर गेट, नियर हनुमान बावडी, भिवंडी, जिल्हा ठाणे. माझ्या नावावर व माझ्या मुलाच्या नावावर भिवंडी सिटी पोलिस स्टेशन (कुंभारवाडा) भिवंडी, ठाणे, महाराष्ट्र ४२१३०२ मध्ये किती अर्ज / NC केस /FIR नोंद आहेत याबाबत माहिती मिळण्याबाबत व छायांकित प्रत."*

..२/-

जन माहिती अधिकारी यांनी दि. २७.१२.२०२३ रोजी अपिलार्थीना कळविले की, सदर माहितीचा विषय "जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ पोलीस निरीक्षक, भिवंडी शहर (कुंभारवाडा) पोलीस स्टेशन, कोटर गेट मस्जिद जवळ, इस्लामपुरा, भिवंडी, जि ठाणे- ४२१३०२" या कार्यालयाशी संबंधीत असल्याने अपिलार्थीचा मूळ माहितीचा अर्ज कलम ६(३) अन्वये सदर कार्यालयास हस्तांतरीत करण्यात येत आहे. अपिलार्थींचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. ०१.२०२४ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ३१.०१.२०२४ रोजी जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही अधिनियमानुसार योग्य आहे असे नमुद करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, अपिलार्थीना माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि. २७.१२.२०२३ रोजी उत्तर दिलेले होते व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य ठरवून दि. ३१.०१.२०२४ रोजी प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीना उत्तर दिलेले आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

प्रदीप cuim
10-9-2025

State Information Commission
Greater Mumbai

**मुंबई** **(डॉ. प्रदीप व्यास)**
**दिनांक : १०.०९.२०२५** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**